नि.दि.दा.क्र. २०/२००२
हणमंत व इतर वि. महादेव व इतर

## निशाणी क्र. १९२ वरील आदेश

वादींनी सदरचा अर्ज मयत प्रतिवादी क्र.२ चे विरुद्ध झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादींचे असे कथन आहे की, वादींनी सदरचा दावा हा वाद मिळकत त्यांच्या मालकीची असल्याबाबत तसेच दि. १८/०८/२००४ रोजीचा लेख त्यांच्यावर बंधनकारक नाही याबाबत जाहिर ठराव होण्याकरिता व निरंतर ताकीद मागणेकामी दाखल केला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.२ श्री श्रीपती प्रभु व्याहळीकर (कांबळे) हे दि.३०.१०.२०१३ रोजी मयत झाले आहेत. परंतु मयत वादीचे वारस दाव्याचेकामी रेकॉर्डवर घेणेबाबत व त्याबाबतची माहिती त्यांनी वकिलांना दिलेली नसल्याने त्यांना वादीचे वारस रेकॉर्डवर घेणेस उशीर झाला आहे. त्यामुळे सदरचा दावा हा प्रतिवादी क्र.२ विरुध्द अबेट झालेला आहे. सबब, वादींनी मयत प्रतिवादी क्र.२ चे विरुद्ध झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. सदर अर्जावर प्रतिवादींनी म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकुर नाकारला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की वादींनी जाणुनबुजुन ११ वर्षे ६ दिवसांचा विलंब मुद्दामहुन केलेला असल्याने अबेटमेंटचा आदेश पारीत केलेला आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा. यदाकदाचित तो मंजूर करणेचा झाल्यास र.रु.१०,०००/- सह मंजूर करावा.

३. वादी व प्रतिवादींतर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. वादींनी सदरचा दावा हा वाद मिळकत त्यांच्या मालकीची असल्याबाबत तसेच दि. १८/०८/२००४ रोजीचा लेख त्यांच्यावर बंधनकारक नाही याबाबत जाहिर ठराव होण्याकरिता व निरंतर ताकीद मागणेकामी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. २ श्रीपती प्रभु व्याहळीकर (कांबळे) हे दि.३०.१०.२०१३ रोजी बावधन तालुका वाई येथे मयत झाले आहेत. त्यांच्या मृत्यूच्या दाखल्याची प्रत नि.क्र.१९१ सोबत दाखल आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पहाता प्रस्तूत प्रतिवादी क्र.२ चे वारसांना रेकॉर्डवर घेणे आवश्यक

वाटते. त्यांना अशी संधी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना अशी संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द वादींना मयत प्रतिवादी क्र.२ चे वारस म्हणून घेण्याची संधी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. त्याकरीता त्यांचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होणे गरजेचे आहे.तथापी वादीतर्फे प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्याकरिता अत्यंत दिर्घ विलंब झालेला आहे त्यामुळे त्याबाबत त्यांच्यावर आवश्यक तो खर्च लादने न्यायोचित आहे. सबब, प्रस्तूतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे:

<u>आदेश</u>

१. अर्ज (नि.क्र.१९२) मंजूर करण्यात येतो.

२. मयत प्रतिवादी क्र.२ चे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश वादीने र.रु. १,०००/- प्रतिवादीचे वारसास दिल्यानंतर रद्द करण्यात येतो.

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.02.25 15:00:12 +0530

स्थळ : वाई (आर.एम.भेंडे)
दिनांक : २१.०२.२०२५ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर वाई.